# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

क्र : मविनिआ/माअअ/51/2018/ 0168

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

दि.06.09.2018

प्रति,
श्री. दामोदर जुगलकिशोर पारिक,
नवजीवन कॉलनी, मु.पो. ता. वैजापूर,
जिल्हा- औरंगाबाद- ४२३ ७०१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दिनांक ०४.०८.२०१८ रोजीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) अन्वये आयोगाच्या कार्यालयास दि. ०८.०८.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | औरंगाबाद परिमंडळासाठी ग्राहक गा-हाणी निवारण मंचावर दि. 21.02.2018 ते 20.02.2020 पर्यंतच्या कार्यकाळासाठी ग्राहक प्रतिनिधी म्हणून एकाच व्यक्तीची चौथ्यांदा नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्ती कायद्यातील तरतूदींचा भंग करणारी व बेकायदा आहे. म्हणून दि.18 जुन, 2018 रोजी मी मा. अध्यक्ष, महाराष्ट विद्युत नियामक आयोग, कार्यालय मुंबई यांना एक तक्रारी निवेदन पाठवून उपरोक्त सदस्यांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी केली होती. त्या अर्जावर काही कार्यवाही झाली असल्यास त्याची सविस्तर माहिती मला पाठविण्यात यावी ही विनंती. | दि. 18.06.2018 तक्रार अर्जानुसार मा. आयोगाने संबंधित कार्यालयाकडून स्वयंस्पष्ट अहवाल व इतर दस्ताऐवज आयोगाला सादर करण्याबाबत कळविले आहे. तत्पश्चात प्राप्त स्वयंस्पष्ट अहवाल आणि माहिती नुसार आयोगाकडून दखल घेण्यात येईल.<br>सदरहू अहवाल या कार्यालयाकडे अद्याप अप्राप्त आहे. |

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी